# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १८४-२२** **दिनांक :- १७/०६/२०२२**

## चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन ३ गुन्हे ऊघडकीस-विरार पोलीस स्टेशनची कामगिरी.

विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रवाश्यांच्या बॅग उघडून त्यातील सोन्याचे दागीने, रोख रक्कम तसेच टायर चोरी अशा करणे अश्या स्वरुपाच्या घटना होत असल्याने सदर प्रकारच्या गुन्हयांना आळा घालून घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने विरार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी आणि अंमलदार यांनी घडलेल्या प्रत्येक गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट देऊन उपलब्ध उपलब्ध पुरावे व गोपनीया माहितीच्या आधारे संशईत नामे राहुल उमेश कदम, रा. रुम नं-३०४ बी, गोविंद छाया अपार्टमेट, साईनाथनगर, विरार पुर्व. सध्या राहणार- बी/२०२, साई एव्हेन्यु अपार्टमेट, नाना-नानी पार्क, मनवेलपाडा, विरार पुर्व ता-वसई जि-पालघर यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याने सदर प्रकारचे गुन्हे केल्याची माहिती दिल्याने त्यास दि १३/६/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. सदरचा आरोपी हा रेल्वे स्टेशन किंवा त्या जवळच्या परिसरामध्ये हातचालाखीने प्रवाशांची बॅग उघडून त्यामध्ये असलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कमेची तसेच रात्रीच्या वेळी उघडयावर उभ्या असणा-या रिक्षाचे टायर, बॅटरी चोरी करीत होता. आरोपी नामे राहुल कदम याचेकडे विचारपुस करता त्याने विरार पोलीस ठाणे कडील दाखल खालील ३ गुन्हयांची कबुली दिली असून त्याचेकडून ४०,०००/- रुपये किंमतीचा नमुद गुन्हयात चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

१. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ४९२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४
२. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ५१५/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९
३. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ४०२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९

यातील अटक आरोपी राहुल कदम याचेवर लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये चोरीचे ०२ गुन्हे तसेच विरार पोलीस ठाण्यामध्ये ०२ गुन्हे दाखल असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०३, श्री. रामचंद्र देशमुख , सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप शेरमाळे, पो.ना. हर्षद चव्हाण, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सागर घुगरकर यांनी केली आहे.